महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/महाडीबीटी/२०२१/ 5457

दिनांक : 07 DEC 2021

## परिपत्रक

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व
शासकीय व शासन अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने
पुणे विभाग, पुणे.

**विषय- शिक्षण शुल्क व इतर शुल्काबाबत.**

संदर्भ- १. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं-गुविआस/१४ अई/२०२१-२२/१३०९८ दि.१०.११.२०२१

२. शासन निर्णय क्रमांक एफईडी-१०८३/१८१६३५(२३३७)/साशि-५,दि.१७ मे.१९८४.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्र क्र.०१ च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा यामध्ये गुणवत्ता यादीत वरच्या क्रमांकाने स्थान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या **पुढील शिक्षणासाठी** आर्थिक सहाय्यं देण्याची योजना उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे मार्फत राबविण्यात येते. सदर विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शुल्काची प्रतिपूर्ती शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालये यामध्ये मान्य दराने आकारल्या जाणाऱ्या शुल्काच्या दराने केली जाते. सदर योजनेसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची यादी उच्च शिक्षण संचालनालयाकडून प्रसिद्ध झाली असून विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होत आलेली आहे. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी पदविका व पदवी अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणारी प्रवेश फी, सत्र फी, शिक्षण फी, ग्रंथालय फी, प्रयोगशाळा फी, जिमखाना फी, व परिक्षा फी याबाबतची शासकीय महाविद्यालये व अनुदानित महाविद्यालये यांची स्वतंत्र माहिती मागीतली आहे.

तरी या विभागाय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकिय महाविद्यालये व अनुदानित महाविद्यालये यांनी खाली दिलेल्या गुगल फॉर्म मध्ये वरील प्रमाणे नमुद शुल्कांची माहिती दि.१०.१२.२०२१ पर्यंत उपलब्ध करून देण्यात यावी.

सोबत- गुगल फॉर्मची लिंक देत आहे.
https://forms.gle/hydeHFLcauAKZ5fo9

(डॉ. दत्तात्रय जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.